
आधुनिक विचारांचे
# वर्तमान

बीड । मंगळवार, १२ ऑक्टोबर २०२१ । वर्ष : ३ | आपले वृत्तपत्र, आपला आवाज | अंक : ५० । पाने : ४ । मूल्य २ ₹

## पत्रकारांची नोबेलवर मोहोर




ओस्लो : जगभरात प्रतिष्ठेचा समजल्या जाणाऱ्या शांततेच्या नोबेल पुरस्काराची घोषणा करण्यात आली आहे. यंदा दोन पत्रकारांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाला असल्याची घोषणा नोबेल पुरस्कार समितीने केली आहे. फिलीपाइन्सनमधील मारिया रेस्सा आणि रशियातील दिमित्री मुरातोव्ह या दोन पत्रकारांना शांततेच्या नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

# दसऱ्यापूर्वी शेतकऱ्यांना नुकसान-भरपाई द्या : पंकजा मुंडे

▶ प्रतिनिधी

मुंबई : बीड जिल्ह्यातील अतिवृष्टीचा फटका बसलेल्या शेतकऱ्यांना दसऱ्यापूर्वी सरकारने नुकसान-भरपाई द्यावी, अशी मागणी भाजपा राष्ट्रीय सचिव तथा माजी मंत्री पंकजा मुंडे यांनी केली. दरम्यान, महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांची मुंडे यांनी भेट घेऊन नुकसानीबाबत चर्चा केली.

नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील शेती पिकांचे तसेच शेत जमिनीचे मोठे नुकसान झाले असून जीवित व वित्त हानी मोठ्या प्रमाणावर झाली आहे. अशा परिस्थितीत संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्यासाठी शासनाने दसऱ्यापूर्वी अतिवृष्टीची नुकसानभरपाई जाहीर करावी अशी मागणी भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांनी केली आहे.

बीड जिल्ह्यातील सर्वच तालुक्यांना अतिवृष्टीचा जोरदार फटका बसला आहे. जिल्ह्यात ७ लाख ७२ हजार हेक्टर खरीप पेरणी क्षेत्रापैकी ५ लाख ४६ हजार हेक्टर क्षेत्र अतिवृष्टीने बाधित झाले आहे.



काढणीला आलेले सोयाबीन, कापूस, उडीद, मूग, बाजरी आदी पिके पूर्णपणे उध्वस्त झाली आहेत. गेवराई, माजलगाव, केज, अंबाजोगाई, आष्टी, पाटोदा, शिरूर, वडवणी, परळी, धारूर आदी भागांत केवळ उभ्या पिकांचेच नाही तर शेत जमिनीची माती वाहून गेल्याने मोठे नुकसान झाले आहे. जून ते आजपर्यंत २२ जण पुराच्या पाण्याने मृत झाले असून ४६५ जनावरे दगावली आहेत. २० हजाराहून अधिक शेती पंप बंद पडली आहेत.

माजलगाव धरणातून पाणी सोडल्याने पूर परिस्थिती निर्माण झाली असून शेतात, घरात पाणी शिरल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. २४ पाझर तलाव देखील फुटले आहेत. १४७ किलोमीटरचे रस्ते खराब झाले असून ६९ पुलांचे नुकसान झाले आहे. शासनाने अशा कठीण समयी त्यांच्या पाठिशी उभे रहावे आणि दसऱ्यापूर्वी नुकसान-भरपाई जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी पंकजा मुंडे यांनी केली आहे.

**बातमी व जाहिरातीसाठी संपर्क**

9423209823

मुख्यालय : 'शिवगड' २३, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड




# लाखिमपुरचे माजलगावात तीव्र पडसाद

## शिवसेना, राष्ट्रवादी, काँग्रेस आणि डाव्या संघटना रस्त्यावर; बंदला संमिश्र प्रतिसाद

▶ प्रतिनिधी

माजलगाव : उत्तरप्रदेशमधील लाखिमपुर येथील शेतकरी नरसंहार घटनेचे तीव्र पडसाद बीडसह माजलगाव मतदारसंघात उमटले. उत्तरप्रदेश सरकार आणि केंद्र सरकारचा यावेळी धिक्कार करण्यात आला. महाराष्ट्र बंद कडकडीत पाळण्यासाठी शिवसेना, राष्ट्रवादी, काँग्रेस आणि डाव्या विचारसरणीच्या संघटना रस्त्यावर उतरल्या. दरम्यान, माजलगाव शहर बंदला संमिश्र प्रतिसाद मिळाला असून कोणताही अनुचित प्रकार घडला नाही.

लाखिमपुर येथे देशातील शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या मागण्यासाठी सुरू असलेल्या शेतकरी आंदोलनात केंद्रीय मंत्र्यांच्या मुलांच्या गाड्याने शेतकऱ्यांना चिरडून मारले या आरोपींना फाशी द्या आणि केंद्र सरकारच्या निषेधार्थ दि.११ ऑक्टोबर सोमवार रोजी पिडीतांच्या समर्थनार्थ महाविकास आघाडी आणि संयुक्त किसान कामगार मोर्चा च्या वतीने महाराष्ट्र बंदचे अवाहन केले होते. याला संमिश्र प्रतिसाद मिळाला. शहरातील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते छत्रपती संभाजी महाराज चौकापर्यत यावेळी आली काढत बंदचे



आवाहन करण्यात आले. या रॅलीमध्ये शिवसेना, माकप, राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस आय, मानवी हक्क अभियान, महाविकास आघाडी संयुक्त किसान कामगार मोर्चा यांचे कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जयसिंह सोळंके, शिवसेना जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव, शेकापचे भाई अॅड.नारायण गोले पाटील, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे मोहन जाधव, माकप तालुका सचिव मुसद्दिक बाबा, काँग्रेसचे नारायण होके, दत्ता कांबळे, शेख रशिद, तुकाराम येवले, सभापती संभाजी शेजुळ, एन.टी.सोळंके, नगराध्यक्ष शेख मंजूर ,विश्वांभर थावरे, राजेश घोडे, रमेश सोळंके, दयानंद स्वामी,रोहन घाडगे,राहुल लंगडे, अॅड.प्रमोद तौर, नितीन जाधव, डीवायएफआयचे अॅड.सय्यद याकुब, विनायक चव्हाण, रशिद शेख, सिद्धार्थ ससाणे, फारुख सय्यद, नासेर खान, दुसतराव सोळंके, सादेक पठाण, अशोक आळणे, शिवमूर्ती कुंभार, शरद सोळंके, अतुल उगले, नामदेव सोजे, दासू बादाडे, संजय शिंदे, अशोक कुंडकर, प्रविण गवते, आदी उपस्थित होते. मागण्यांचे निवेदन नायब तहसिलदारांना देण्यात आले.

### लाखिमपुर घटना लोकशाहीला काळिमा : भाई अॅड.नारायण गोले



लाखिमपुर येथील गुंड प्रवृत्तीच्या राजकारणांनी घेतलेले शेतकऱ्यांचे बळी हा लोकशाहीला काळिमा असून या घटनेचा करावा तेवढा निषेध कमीच आहे. शेतकऱ्यांच्या प्रश्नी आघाडी सरकारच्या घटक पक्षांनी काढलेल्या महाराष्ट्र बंदला डाव्या चळवळींनी पाठिंबा दिला. बंद अयशस्वी करण्यासाठी भाजपने अटोकाट प्रयत्न केले. मात्र सर्वत्र बंदला मोठा प्रतिसाद मिळाला, हे चळवळ जिवंत असल्याचे लक्षण आहे. काही घटकांनी सोशल मीडियावर महाराष्ट्र बंदची खिल्ली उडविली. ही बाब संतापजनक आहे, अशी प्रतिक्रिया 'वर्तमान'शी बोलताना शेकाप नेते भाई अॅड.नारायण गोले पाटील यांनी दिली.

## फास्टट्रॅकन्यूज

### भाजपला सत्तेची मस्ती; सुप्रिया सुळेंनी तोफ डागली



मुंबई : भाजपला सत्तेची मस्ती आहे, बाकी काही नाही, अशा शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे यांनी भाजपवर शरसंधान साधले आहे. सोमवारी लखिमपूर हत्याकांड प्रकरणी निषेध करण्यासाठी महाविकास आघाडीने 'महाराष्ट्र बंद'चे आवाहन केले होते. त्यानुसार हुतात्मा चौकात राष्ट्रवादीच्या वतीने केंद्र सरकार आणि उत्तरप्रदेश सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. सरकार कुणाचंही असो ही जी कृती झाली ती चिंताजनक आहे. त्यामुळे केंद्र सरकारने जनतेला व शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी अपेक्षा खासदार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केली.

### उद्योजिका अर्चना कुटे यांचा जागतिक सन्मान



**बीड :** जिल्ह्यातील यशस्वी उद्योजिका अर्चना सुरेश कुटे यांचा जागतिक पातळीवर सन्मान झाला आहे. एशिया वन माध्यम समुहाने 'ब्लॅक स्वॅम' पुरस्कार दिला आहे. औद्योगिक क्षेत्रात असामान्य कामगिरी केल्याबद्दल कुटे यांच्या तिरूमलाला आजपर्यंत अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. यामध्ये ब्लॅक स्वॅम या प्रतिष्ठेच्या पुरस्काराची भर पडली. महिलांच्या सबलीकरणाबद्दल एशिया वन मॅगझिनच्या वतीने अर्चना कुटे यांना हा जागतिक सन्मान मिळाला. कुटे ग्रुपच्या वतीने औद्योगिक क्षेत्रात नवनवीन प्रयोग करून देशाच्या अर्थकारणाला गतीमान करण्यासाठी भरीव योगदान दिले जात आहे.







# आपलेपणा जपणारे विनायक रत्नपारखी

**साधारणत: राजकीय क्षेत्रातील मंडळी म्हटलं की समोर येतो भपकेबाजपणा, राजकीय दबदब्यातून मिळवलेल्या संपत्तीचं ओंघळवाणं प्रदर्शन, चेहऱ्यावर असलेला जन्मजात उन्मत्त, पण या सगळ्याला छेद देत काही माणसं अशीही असतात जी आपल्या मधाळ शब्दांनी, मनमोहक हास्याने व आपलंस करणाऱ्या व्यक्तिमत्त्वामुळे इतरांपेक्षा दैदिप्यमान वाटतात आणि त्याचंच एक उत्तम उदाहरण म्हणजे भारतीय जनता पक्षाचे युवा नेते विनायक रत्नपारखी ऊर्फ सर्वांचे लाडके 'मामा'**

किशोरवयात आई बापाचं छत्र हरवलेल्या विनायकरावांच्या आयुष्यातील सुरुवातीचा काही काळ अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत व्यतित झाला. खडतर परिस्थितीतून घेतलेलं शिक्षण व त्यातून माजलगावमध्ये झालेली व्यावसायिक सुरुवात, व्यावसायिकतेतून समाजकारण आणि शेवटी राजकारण असा प्रवास करत करत हे व्यक्तिमत्त्व आज राजकारणात एका विशिष्ट पातळीवर यशस्वीरित्या येऊन पोहोचलं आहे. मामा म्हणजे एक अजातशत्रू, शांत, संयमी, श्रृजनशील व्यक्तिमत्व आहेत, असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. साधारणपणे पुढारी म्हणजे मग्रुर असतात असा सार्वजनिक समज आहे पण समोर आलेली व्यक्ती मग ती वयाने लहान असो वा मोठी, गरीब असो वा श्रीमंत, कार्यकर्ता असो वा पदाधिकारी वा सामान्य व्यक्ती अशा सर्वांना सन्मानाची वागणूक देऊन प्रत्येकासोबत आपलेपणाचे एक प्रेमळ नाते तयार करणारं व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांचा अवश्य उल्लेख केला जातो. आपण ज्या समाजात वावरतो त्या समाजाप्रती आपली बांधिलकी जपनारी फार थोडी माणसं असतात. मामांनी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे असं म्हटलं तर चुकीचं ठरणार नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या जनकल्याण समितीच्या माध्यमातून अभ्यासिका स्थापण करणे, गरजू व गरीब लोकांसाठी वेळोवेळी विविध प्रकारे मदत किंवा आधार देण्याचं काम सतत मामांच्या हस्ते होतं. रोटरीक्लब ऑफ माजलगाव सिटीच्या माध्यमातून सामाजिक कार्याचा श्री गणेशा करुन आज मामा एक नगरसेवक संबोधण्याऐवजी समाजसेवक म्हणून संबोधले जातात. राजकारण हा बदमाशांचा शेवटचा अड्डा असं आपण म्हणतो पण अशा बेभरवशाच्या क्षेत्रात मामा एक 'आपला हक्काचा माणूस' वाटतात. राजकीय गणितं-तडजोडी किंवा पेच-डावपेच यात ते कितपत यशस्वी झाले हा मुद्दा वेगळा असला तरी ते एक माणुस म्हणुन शंभर नंबरी सोनं म्हणून सिद्ध झालेले आहेत. राजकारण हा शक्यता-अशक्यतांचा खेळ मानला जातो, कधी कुणाच्या मनीमानसी नसताना मामा नगरसेवक झाले, त्या पाठोपाठ गटनेते,भाजपचे तालुका प्रवक्ते आणि सभापतीदेखील झाले. आपलं पूर्वपुण्य आपल्या नक्की कामी येतं हे मामांच्या वाढत्या राजकीय आलेखाकडे बघून समजतं कारण भूतकाळात केलेल्या निरपेक्ष सामाजिक कामाच्या माध्यमातून लाभलेल्या सदिच्छा आणि आशिर्वाद मामांना राजकीय यशाच्या शिखरावर ठेवण्याच्या कामी आल्या.



**निमित्त**

**ओम देशमुख**

केवळ सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात मर्यादित वावर म ठेवता मामांनी सहकार व शिक्षण क्षेत्रातही सक्रिय सहभाग नोंदवलेला आहे. माजलगावमधील उच्चतम शैक्षणिक दर्जा असणार्या यशवंत शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक म्हणून मामा कार्यरत आहेत. भाजपचे राज्य पातळीवरील नेते डॉ.प्रशांत पाटील यांच्या सिद्धिविनायक अर्बन सहकारी संस्थेच्या उभारणीत व तिच्या यशस्वी प्रवासात विनायक मामांची साथ नक्कीच नोंदणीय आहे..ब्राम्हण समाजाच्या न्याय हक्कासाठी लढणाऱ्या परशुराम सेवा संघाचे राज्य शाखेचे उपाध्यक्ष म्हणून मामा सक्रिय आहेत. सर्वसाधारणपणे राजकीय क्षेत्रातील व्यक्तींना ऐतिहासिक गोष्टी माहित असणं आवश्यक असतं व हाच धागा पकडून माजलगांव येथे कार्यरत असणार्या शिवशंभू विचार दर्शनचे सदस्य म्हणून छत्रपती शिवाजी महाराज यांचं कार्य शेवटच्या व्यक्तीपर्यत पोहोचवण्यात मामा आग्रही आहेत. राष्ट्र प्रथम या संकल्पनेला अग्रस्थानी मानून आयुष्याची ध्येयनिश्चिती केलेला प्रखर राष्ट्रभक्त,साधी राहणी आणि उच्च विचारसरणी हे तत्व अंगिकारलेला एक राजकारणी, एक व्यावसायिक, सहकारी संस्थांचा सक्रिय सदस्य, अभ्यासू व उत्तम वक्ते, कुशल संघटक, एक आदर्श पती-पिता-भाऊ, अठरापगड जातीधर्माच्या लोकांशी सलोख्याचे संबंध असणारा जिवाभावाचा 'आपला माणुस,प्रत्येकाच्या सुख दुःखात सहभागी होणारा सर्वांचा पारिवारिक सदस्य, आपुलकीचे दुसरे नाव विनायक रत्नपारखी होय.

# संपादकीय

## धार्मिक, ज्ञानमंदीरे खुली झाल्यानंतर...

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लॉकडाऊनच्या नियमामुळे कित्येक महिने शाळा आणि मंदिरे बंद होती. आता ही धार्मिक, ज्ञानमंदीरे गजबजल्याने सकारात्मक ऊर्जा निर्माण होताना दिसत आहे. राज्यातील शहरी भागांत आठवी ते बारावी आणि ग्रामीण भागांत पाचवी ते दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी अनेक शाळा सोमवार, ४ ऑक्टोबरपासून आणि मंदिरं गुरुवार ७ ऑक्टोबरपासून पुन्हा सुरू झाल्यामुळे कोरोना महामारीच्या दहशतीने काळवंडलेल्या वातावरणात फार मोठा सकारात्मक बदल घडून आला असून कित्येकांच्या चेहऱ्यावर समाधानाचे स्मित उमटले असणार. कोरोनामुळे लागू झालेल्या लॉकडाऊनच्या प्रक्रियेमुळे सारे व्यवहार, दळणवळण, उद्योग, व्यवसाय ठप्प झाले होते. संचारबंदीच्या या श्रृंखलेचा सर्वाधिक फटका हा शाळा, महाविद्यालयांना बसला. त्याचबरोबर लोकांची गर्दीची ठिकाणे प्रथम बंद करण्यात आल्याने प्रमुख देवस्थानांबरोबरच सर्व मंदिरं बंद ठेवण्यात आली होती. कोरोना विषाणूचा हल्ला घरातील छोट्यांवर होऊ नये अशी रास्त भीती प्रत्येक घरात व्यक्त होत राहणे हेही स्वाभाविक आहे. त्यामुळे संसर्गापासून ही मुले कितपत दूर राहू शकतील याविषयी पालकांप्रमाणेच शिक्षणतज्ज्ञ आणि सरकारलाही संदेह वाटत होता. मात्र लसीकरणाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे आणि दुसऱ्या लाटेच्या रौद्र तडाख्यानंतर अलीकडे बाधितांचे प्रमाणही आटोक्यात आल्यामुळे, शाळा सुरू करण्याचा महत्त्वाचा टप्पा सुरू करणे क्रमप्राप्त होते. त्यातच मंदिरंही खुली करण्याचा महत्त्वाचा निर्णय सरकारने घेतला. गेले अठरा महिने बंद असलेल्या शाळांची दारे नुकतीच उघडण्यात आली. घरात बंदिस्त असलेल्या छोट्यांना शाळेत परतणे वाटते तेवढे सोपे नाही हे सर्व संबंधितांना चांगलेच ठाऊक असणार. पालक–शिक्षक आणि शाळकरी विद्यार्थ्यांसाठी हे सर्वच खूप आव्हानात्मक आहे हे निश्चित. गेले दीड वर्ष शाळा बंद असण्याचा परिणाम सर्वांवर वेगवेगळा व भिन्न प्रमाणात झाला आहे. मुलांचा, शिक्षकांचा एकमेकांशी असलेला थेट संपर्क खऱ्या अर्थाने तुटला आहे. या कोरोना काळात प्रत्येकाच्या घरातील परिस्थिती वेगळी होती. काहींना जवळच्या व्यक्तींच्या मृत्यूमुळे झालेले दुःख, काहींना नोकरी, रोजगार गमवावे लागल्याने आलेले नैराश्य, उद्योग–व्यवसायांत प्रथमच झालेले बदल व त्यातून आलेली अनिश्चितता, आवकच होत नसल्याने सतत पैशांची भासणारी चणचण, भविष्याबद्दलची भीती व घालमेल, ऑनलाइन शिक्षणामुळे विस्कटलेली घडी, त्यातच मोबाईलचे लागलेले वेड आणि व्यसनाधिनता या व अशा अनेक आव्हानांना बहुतेकांना सामोरे जावे लागले आहे. त्यामुळे शाळेत परतताना असंख्य भावनांनी घेरलेली ही मुले आणि त्यांचे भांबावलेले पालक यांना परत शिक्षण व्यवस्थेमध्ये सामावून कसे घ्यायचे, अध्ययनाला पोषक वातावरण कसे निर्माण करायचे, विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी काय उपाययोजना कराव्यात, असे अनेक प्रश्न पालक, शिक्षक, व्यवस्थापन यांच्यापुढे उभे राहिले आहेत. पण तज्ज्ञांचे सल्ले आणि बालरोगतज्ज्ञ यांच्या समितीने केलेल्या सर्वसाधारण सूचना यांचे पालन करणे आवश्यक ठरले आहे. त्यातूनच शाळांतील सर्व प्रौढांचे लसीकरण, सामाजिक सुरक्षित अंतर ठेवणे, योग्य पद्धतीने मास्कचा वापर, नियमितपणे हातांची स्वच्छता आणि सर्दी–तापासह अन्य काही आजारांची लक्षणे आढळल्यास शाळेत न येणे या सर्वसाधारण सूचना पाळणे क्रमप्राप्त आहे. शाळेमध्ये योग्य प्रमाणात हवा खेळती ठेवणे, गर्दी टाळणे आवश्यक असून कोरोना संसर्ग टाळण्यासाठी मुलांच्या संख्येवर नियंत्रण ठेवणे, एकमेकांच्या गोष्टींचा वापर टाळण्याबरोबरच नियमावलींबाबत विद्यार्थ्यांशी चर्चा करणे अधिक महत्त्वाचे बनले असून हे करताना पालक–शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यात समन्वय असणे आवश्यक बनले आहे. शाळा–विद्यालये बेमुदत बंद असल्याने मुला–मुलींमधील वाढलेला एकाकीपणा, घरात कोंडून राहावे लागल्याने आलेले शैथिल्य, चीडचीड, कंटाळा, ताणतणाव, अनिश्चितता, भविष्याबद्दल चिंता, घालमेल या व अशा अनेक भावनांचा पाल्यांच्या आणि पालकांच्या मानसिक स्वास्थ्यावर परिणाम झाला आहे. नैराश्य, आवेगशीलता, चंचलपणा वाढला आहे. त्यामुळे शाळा सुरू झाल्यावर विद्यार्थ्यांना प्रथम भावविश्वाबाबत सक्षम करणे गरजेचे बनले आहे. किंबहुना मुला–मुलींचे मानसिक स्वास्थ्य सुदृढ करण्यासाठी शाळा सुरू झाल्याने आता भावनांचा कल्लोळ समजण्यासाठी, त्याचे आकलन व्हावे यासाठी एक विशेष तासिका असणे गरजेचे बनले आहे. विद्यार्थ्यांना त्यात भावनिक प्रशिक्षण देऊन भावनिकदृष्ट्या साक्षर करणे अत्यावश्यक आहे. हे सर्व करताना शिक्षक हा यातील प्रमुख धागा असून त्यांचे विद्यार्थ्यांशी असलेले भावनिक नाते मुला–मुलींच्या मानसिक स्वास्थ्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे.

# इलेक्ट्रिक गाड्या घातक की फायदेशीर?

**महाराष्ट्रात आणि भारतातही इलेक्ट्रिक गाड्यांची संख्या वाढलीय. त्यामुळे शहरांमधलं प्रदूषण कमी होतंच पण जागतिक तापमानवाढ, हवामान बदल रोखण्यातही मदत होते, असं सांगितलं जातं. पण हे अर्धसत्य आहे. काही गोष्टींची काळजी घेतली तरच ते शक्य आहे. नाहीतर या गोष्टी केवळ कागदावरच राहतील असं नाही तर त्यामुळे पर्यावरणावर आघात होण्याचा धोका वाढतो.**

जिज्ञासा
**अभिजित घोरपडे**

महाराष्ट्राच्या अनेक शहरांमधे रस्त्यांवर मोठ्या संख्येने इलेक्ट्रिक गाड्या दिसत आहेत. हिरव्या नंबर प्लेट असलेल्या टू विलर्स, गाड्यांबद्दल पूर्वी अप्रूप वाटायचं, ते आता राहिलेलं नाही. आताची परिस्थिती पाहता इलेक्ट्रिक गाड्या वापरण्याची दोन कारणं पुढे येत आहेत. एक म्हणजे पेट्रोल, डिझेलची मोठ्या प्रमाणात झालेली दरवाढ, पेट्रोलने ओलांडलेली शंभरी. अशा परिस्थितीत या गाड्या वापरायला परवडतात. पेट्रोल–डिझेलच्या तुलनेत चार्जिंगसाठी फारसा खर्च येत नाही. त्यांची देखभालही विशेष नसते. त्यामुळे दैनंदिन खर्च कमी होतो. दुसरं कारण म्हणजे, या गाड्यांना इको–फ्रेंडली' म्हणून मिळालेली मान्यता. त्यामुळे पर्यावरणाबाबत आस्था वाटणारे अनेक जण या गाड्यांचा वापर करतात. रस्त्यावरचं प्रदूषण कमी करणाऱ्या, गोंगाट न करणाऱ्या गाड्या म्हणून त्यांच्याकडे पाहिलं जातं. आणि ते खरंही आहे. अजून एक गोष्ट म्हणजे या गाड्यांमुळे जागतिक तापमानवाढ रोखायला मदत होणार आहे. कार्बन वायूंचं उत्सर्जन होणार नाही. त्यामुळे या खऱ्या अर्थाने ग्रीन गाड्या' ठरतील आणि आपल्याला जागतिक तापमानवाढ, हवामान बदल या समस्यांमधून वाट काढून देतील.



इलेक्ट्रिक गाड्यांना प्रोत्साहन

अलीकडच्या काळात, केंद्र आणि राज्य सरकारच्या पातळीवरही हा मुद्दा जोरकसपणे मांडला जात आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी तसंच महाराष्ट्राचे पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे यांच्याकडूनही अशी मांडणी होत आहे. त्यामुळे या गाड्यांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने धोरणं आखली जात आहेत. भारतातला भविष्यातला गाड्यांचा उद्योग कोणत्या दिशेने जाणार आहे, हेही यावरून स्पष्ट होत आहे. या गाड्या एकदा चार्ज केल्यावर जास्त अंतरापर्यंत चालाव्यात यासाठी लागणाऱ्या जास्त क्षमतेच्या बॅटरीज तसंच, त्या झटपट चार्ज करण्यासाठी पुरेशी चार्जिंग स्टेशन' ही आताची आव्हानं भविष्यात दूर होतील आणि या गाड्यांना, उद्योगाला चालना मिळेल, असं आताचं वातावरण आहे. पण गाड्यांचा ज्या प्रकारे ग्रीन' म्हणून प्रचार केला जातोय, तितक्या प्रमाणात या गाड्या पर्यावरणस्नेही आहेत का? त्याचबरोबर त्यांच्या वापरामुळे हवामान बदलाची समस्या दूर होईल यात तथ्य आहे का? हे प्रश्न आहेत. या प्रश्नांमुळे काही वाचक कदाचित संभ्रमात पडतील. हवेचं आणि आवाजाचं प्रदूषण न करणाऱ्या या गाड्या असताना त्यांच्याबद्दल या शंका का घेतल्या जात आहेत, असा त्यांचा सवाल असेल. मात्र, या गाड्यांचं स्वागत करताना त्यांच्याबद्दल नेमकी वस्तुस्थिती लक्षात घेतली नाही तर कदाचित पुढे कोणत्या दिशेने जायला हवं, यात आपली फसगत होण्याची शक्यता आहे.

इलेक्ट्रिक गाड्या कशावर चालतात?

इलेक्ट्रिक गाड्यांमधे बॅटरी असते. त्यामुळे बॅटरीवर चालणाऱ्या इतर उपकरणांप्रमाणेच उदा. मोबाईल, लॅपटॉप, वगैरे या गाड्यांमधे ऊर्जा साठवली जाते आणि वापरली जाते. सध्याची पेट्रोल, डिझेल, नैसर्गिक वायू यासारख्या इंधनावर चालणाऱ्या परंपरागत गाड्या यांच्यात वापरली जाणारी ऊर्जा आणि आताच्या इलेक्ट्रिक गाड्या यांच्यात ऊर्जेच्या वापरासंबंधी एक मूलभूत फरक आहे. दोन्ही प्रकारच्या गाड्यांमधे ऊर्जा कोणत्या ना कोणत्या रूपात साठवलेली असते. परंपरागत गाड्यांमधे ती पेट्रोल, डिझेल, गॅस यासारख्या इंधनाच्या रूपात, तर इलेक्ट्रिक गाड्यांमधे बॅटरीच्या रूपाने ऊर्जा साठवलेली असते. मात्र, या साठवलेल्या ऊर्जेचं रूपांतर चल उर्जेत, कायनेटिक एनर्जी केल्याशिवाय गाड्या चालू शकत नाही. ते होताना परंपरागत गाड्यांमधे इंधनाचं ज्वलन होतं. त्या वेळी त्यातून कार्बन डाय ऑक्साईड किंवा इतर वायू बाहेर पडतात. हेच वायू जागतिक तापमानवाढ करायला कारणीभूत ठरतात. याशिवाय इंधनाचं पूर्ण ज्वलन न झाल्यास त्यातून धूर आणि इतर प्रदूषित घटकही बाहेर पडतात. याउलट इलेक्ट्रिक गाड्यांमधे असं ज्वलन होत नाही. त्याऐवजी साठवलेल्या ऊर्जेचं चल ऊर्जेत रूपांतर होताना ते विद्युत–रासायनिक पद्धतीनं होतं. त्यामुळे कार्बन डाय ऑक्साईडसारख्या वायूंचं उत्सर्जन होत नाही, शिवाय धूर आणि इतर प्रदूषित घटकही बाहेर पडत नाहीत. इलेक्ट्रिक गाड्यांच्या वापराचे काही फायदे आहेतच. पण इथं एक प्रश्न उपस्थित होतो की, बॅटरी चार्ज करण्यासाठी लागणारी वीज कुठून येते? आणि ती कशी तयार केली जाते?

वीज अशी तयार होते

इलेक्ट्रिक गाड्यांना लागणारी वीज स्वच्छ प्रकारच्या पद्धतींनी उदा. सौरऊर्जा, पवनऊर्जा, भूऔष्णिकऊर्जा, जलविद्युत यांनी निर्माण केली जात असेल तर या गाड्यांना पूर्णपणे ग्रीन' म्हणता येईल. पण या गाड्यांसाठी लागणारी ऊर्जा अशा स्वच्छ पद्धतींऐवजी कोळसा, खनिज तेल किंवा नैसर्गिक वायू यासारखं जीवाश्म इंधन जाळून केली जात असेल हा हेतू साध्य होत नाही. जागतिक तापमानवाढ रोखण्यासाठी कार्बन वायूंचं उत्सर्जन कमी करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी वीज स्वच्छ पद्धतींनी निर्माण होते ना, हे निश्चित करणं गरजेचं आहे. नाहीतर वीज तयार होताना जीवाश्म इंधन जाळलं जात असेल आणि अशा विजेवर इलेक्ट्रिक गाड्या चार्ज केली जात असतील तर अपेक्षित परिणाम साध्य होणार नाही. अशा परिस्थितीत गाड्यांमधून कार्बन वायूंचं उत्सर्जन झालं नाही तरी जिथे कुठे वीजनिर्मिती केली जाते, तिथे या वायूंचं उत्सर्जन होणारच. हे सगळं आपल्या नजरेआड होत असल्याने कदाचित या गाड्या ग्रीन' वाटतील, प्रत्यक्षात त्या तशा नसतील. याचा एक फायदा नक्की आहे. अलीकडे दिल्लीसारख्या महानगरांमधे हवेचं प्रदूषण ही प्रचंड मोठी समस्या बनली आहे. त्या दृष्टीने रस्त्यावर धुराचं प्रदूषण न करणाऱ्या गाड्या फायदेशीर आहेत. पण त्यांच्यामुळे जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदलाची समस्या सुटेल, हे म्हणणं अर्धसत्य आहे.

प्रत्यक्ष परिस्थिती काय?

भारताची ऊर्जानिर्मितीची स्थिती पाहता अजूनही आपण मोठ्या प्रमाणावर जीवाश्म इंधनावरच अवलंबून आहोत. याबद्दल नेमकेपणाने आकडेवारी सांगता येईल. केंद्र सरकारच्या केंद्रीय वीज प्राधिकरणानुसार, देशात जीवाश्म इंधन आणि इतर स्वच्छ इंधन यांच्या क्षमतेचं गुणोत्तर सुमारे ६० : ४० असं आहे. याचाच अर्थ जवळजवळ ४० टक्के ऊर्जा स्वच्छ स्रोतांद्वारे निर्माण केली जाऊ शकते. या प्राधिकरणाची २०२० वर्षातली वीजनिर्मितीची आकडेवारी वेगळं चित्र दाखवते. गेल्या संपूर्ण वर्षात देशात झालेल्या ऊर्जानिर्मितीत ८४ टक्के वाटा हा जीवाश्म इंधनाचा आहे. तो वेगवेगळ्या महिन्यात ७९ ते ९० टक्क्यांच्या दरम्यान खाली–वर झाला होता. याचाच अर्थ अजूनही आपण बहुतांश ऊर्जेची निर्मिती जीवाश्म इंधनावरच करत आहोत. या विजेवर इलेक्ट्रिक गाड्यांच्या बॅटरी चार्ज होणार असतील तर मग नुसत्या या मोटारी वापरल्या म्हणून कार्बन वायूंचं उत्सर्जन कसं कमी होणार हा आपल्याकडचा मोठा प्रश्न आहे.

तरच गाड्या पर्यावरणस्नेही बनतील

या गाड्या लगेचच पर्यावरणस्नेही बनणार नाहीत आणि त्यांच्या वापरामुळे आपल्याला अपेक्षित असलेल्या ग्रीन' गोष्टी घडून येणार नाहीत. त्यांना चार्ज करणारी ऊर्जा सौर, पवन, भूऔष्णिक, जल किंवा वाया जाणारा काडी–कचरा अशा स्वच्छ स्रोतांपासून तयार होणार नाही, तोपर्यंत त्यांना पर्यावरणस्नेही म्हणता येणार नाही. या गाड्यांना चार्ज करणारी संपूर्ण वीजसुद्धा पर्यावरणस्नेही असायला हवी. त्यानंतर मग त्यांना खऱ्या अर्थाने ग्रीन' हा किताब देता येईल. तेच लक्ष्य ठेवून आपली पुढील मार्गक्रमणा करायला हवी. किंबहुना, या गाड्यांच्या चार्जिंगसाठी लागणारी सर्वच्या सर्व वीज ही स्वच्छ स्रोतांमधूनच यायला हवी, अशी सक्ती केली तर या गाड्यांचा प्रसार आणि त्यांचं खरंखुरे ग्रीन' बनणं हे एकमेकांना समांतर असं घडून येईल.

असा करतील पर्यावरणावर परिणाम

इलेक्ट्रिक गाड्यांसाठी बॅटरीची आवश्यकता असते. कार्यक्षम बॅटरीसाठी पृथ्वीवर कमी प्रमाणात सापडणारी लिथियम, निकेल, कोबाल्ट, ग्राफाईट यासारखी दुर्मिळ मूलद्रव्यं वापरली जातात. ती मिळवण्यासाठी जास्त प्रमाणात ऊर्जेची गरज लागते. या प्रक्रियेत प्रदूषित घटक मोठ्या प्रमाणात निर्माण होतात. उदाहरण द्यायचं झालं तर, एक टन इतक्या वजनाची ही मूलद्रव्यं मिळवायची असतील तर ७५ टन इतकं ॲसिड वापरावं लागतं. आणि या घातक ॲसिडची विल्हेवाट योग्य पद्धतीने लावली जातेच असं नाही. या प्रकारेही या गाड्यांचा पर्यावरणावर परिणाम होत असतो. ही गोष्टही लक्षात घ्यावी लागेल.

# सॅल्यूट! निकोल ऑलिविरा

**८ वर्षांची ब्राझीलची निकोल ऑलिविरा ही जगातली सगळ्यात लहान खगोलशास्त्रज्ञ. वयाच्या अवघ्या चौथ्या वर्षी तिला अवकाशातल्या ग्रह, ताऱ्यांविषयी ओढ निर्माण झाली. १८ लघुग्रहांचा शोध लावत तिने एक वेगळा विश्वविक्रम केलाय. त्यामुळेच नासालाही तिची दखल घ्यावी लागलीय. ऍरोस्पेस इंजिनिअर बनायचं स्वप्न पाहणाऱ्या निकोलला अवकाश संशोधन आणि विज्ञानाच्या प्रचार प्रसाराचं काम करायचंय.**



विशेष
**अक्षय शारदा शरद**

आपण ७, ८ वर्षांचे असताना काय करतो? काही आठवतंय तुम्हाला? एव्हाना आपली इवलीशी पावलं शाळेकडे वळलेली असतात. बालवाडीनंतरची ही पहिली दोन, तीन वर्ष. आपण दुसरी, तिसरीत असू. नकळतं वय असतं. काही मुलं शाळेच्या वातावरणात मिसळून जातात. तर काहींना शाळा म्हटलं की, त्यांचा चेहरा रडवेला होतो. शाळेत न जाण्यासाठी म्हणून वेगवेगळी नाटकं केली जातात. किती काय घडत असतं या वयात. काही मुलांसाठी शाळा हा या नकळत्या वयातही खूप हळवा कोपरा असतो. नव्या मित्र–मैत्रिणी जोडणं, शिक्षकांशी गट्टी. शाळेतल्या खोड्या, मारामाऱ्या, घरी येऊन एकमेकांच्या चुगल्या लावणं, मनसोक्त खेळणं असंही बरंच काही घडत असतं. काहींना शाळेचा प्रत्येक दिवस हवाहवासा वाटतो. काही मुलांना प्रत्येक दिवसाची उत्सुकता असते. कधी एकदा दिवस उजाडतो आणि आपण शाळेत पाऊल ठेवतो असं झालेलं असतं. या खेळण्या, बागडण्याच्या वयात ब्राझीलमधली निकोल ऑलिविरा ही ८ वर्षांची मुलगी एका वेगळ्याच जगात दंग झालीय. हे वेगळं जग आहे अवकाश संशोधनाचं, ग्रह, ताऱ्यांचं. वयाच्या चौथ्या वर्षी तिला एका वेगळ्या जगाविषयी कुतूहल निर्माण झालं. वयाच्या ८ व्या वर्षी थेट नासा या जगप्रसिद्ध अवकाश संशोधन संस्थेसोबत तिने काम करणं हे तिच्याबद्दलचं कुतूहल वाढवणारं आहे.

चौथ्या वर्षी दुर्बिणीसाठी हट्ट

अवकाशातल्या अद्भुत जगाबद्दल आपल्याला ओढ लागलेली असते. ते जग नेमकं कसंय, तिथले तारे, ग्रह, धूमकेतू हे केवळ आपण पुस्तकात पाहिलेलं, वाचलेलं असतं. त्या त्या इयत्तेपुरतं ते मर्यादित राहतं. त्यापलीकडे या जगाविषयीची माहिती आपल्याकडे नसते. ना फार जास्त ती शाळेत दिली जाते. नासासारख्या संस्थांची नावं तर आपण पुस्तकांच्या पानांमधेच वाचतो. काही मुलं मात्र त्यापलीकडे जात हे अनोखं, अद्भुत जग समजून घेतात. त्या जगापर्यंत पोचतात. निकोल ही अशा मोजक्या मुलांमधे मोडते. या काळात आईवडलांची भूमिका बरंच काम करत असते. निकोलचे वडील जीन कार्लो हे संगणक शास्त्रज्ञ तर आई झिल्मा या एका हस्तकला उद्योगात काम करते. लहानपणापासूनच तिला आकाशातल्या ताऱ्यांचं आकर्षण असल्याचं झिल्मा यांनी 'एजंसे फ्रांस प्रेसे' एएफपी या आंतरराष्ट्रीय न्यूज एजन्सीला सांगितलंय. चार वर्षांची असताना निकोलनं बर्थडेला दुर्बीण गिफ्ट म्हणून मागितली होती. दुर्बीण म्हणजे काय हे आपल्याला त्यावेळी माहितही नसल्याचं तिच्या आईने म्हटलंय. त्यावेळी आपल्याला पुढच्या बर्थडेला काहीच नको यावेळी फक्त दुर्बीण द्या असा तगादा तिने आई–वडलांकडे लावला. दुर्बीण खूप महाग असल्यामुळे घेणं परवडणारं नव्हतं. पुढे ३ वर्षांनी थोडे थोडे पैसे जमा करून तिच्या आई–वडलांनी तिला ते गिफ्ट घेऊन दिलं.

बनायचंय ऍरोस्पेस इंजिनिअर

लहानपणी निकोल आकाशाकडे बघून आपल्या आईला एक तारा मला हवाय असं सारखी म्हणायची. या तिच्यातल्या अवकाश संशोधनातल्या शोधक वृत्तीने तिला एका प्रतिष्ठित शाळेची स्कॉलरशिप मिळवून दिली. तिचं मूळ गाव ब्राझीलमधलं मासेयो. पण स्कॉलरशिपमुळे या वर्षाच्या सुरवातीला हे कुटुंब मूळ गावापासून १ हजार किलोमीटरवर असलेल्या ईशान्येकडच्या फोर्टालेझा शहरात स्थायिक झालं. निकोलसाठी तिच्या वडलांनी घरून काम करणं पसंत केलं. एका खगोलशास्त्र अभ्यासक्रमाला निकोलला प्रवेश घेता यावा म्हणून त्या कोर्सची वयोमर्यादाही कमी करण्यात आल्याचं पीएचवायएस.ओआरजी या इंग्लंडमधल्या विज्ञानविषयक साईटने म्हटलंय. तिची रूम पूर्णपणे रॉकेटची छोटी–छोटी मॉडेल, सौरमंडलाचे फोटो, कॅमेरा, अवकाश संशोधनासंदर्भातले फोटो यांनी गच्च भरून गेलीय. ती संशोधनाचं सगळं काम तिच्या कम्प्युटरवरून करते. तोच तिचा दोस्त.

निकोलचं ऍरोस्पेस इंजिनिअर बनायचं स्वप्न आहे. 'आपल्याला फ्लोरिडा इथल्या नासातल्या केनेडी स्पेस सेंटरमधे जायचंय. एक रॉकेट बनवायचंय.' असं 'एजंसे फ्रांस प्रेसे' या एजन्सीला तिने सांगितलंय. तिचं स्वतःचं युट्यूब चॅनेलही आहे.

लहान वयात लघुग्रहांचा शोध

कम्प्युटरवरून अवकाशातल्या प्रतिमांचा ती अभ्यास करतेय. 'ऍस्टेरॉइड हंटर' असं तिच्या संशोधनविषयक प्रोजेक्टचं नाव आहे. लहान मुलं आणि तरुणांमधे विज्ञानाची गोडी वाढावी त्यांना विज्ञानाशी जोडून घेता यावं, अवकाश संशोधनाची संधी मिळावी हाच उद्देश या प्रोजेक्टमागे आहे. 'इंटरनॅशनल ऍस्ट्रोनॉमिक सर्च कोलॅबरेशन' हा नासाचा एक वैज्ञानिक कार्यक्रम आहे. लघुग्रहांचा शोध हा या कार्यक्रमाचा प्राथमिक उद्देश आहे. त्याच अंतर्गत 'ऍस्टेरॉइड हंटर' या प्रोजेक्टची रचना करण्यात आलीय. ब्राझील सरकारचं विज्ञान खातंही या प्रोजेक्टशी जोडलं गेलंय. इथं जोडल्यावर निकोलनं १८ लघुग्रहांचा शोध लावला. हे रेकॉर्ड आतापर्यंत इटलीच्या १८ वर्षीय लुईगी सॅनिनोच्या नावावर होतं. निकोलने लावलेल्या लघुग्रहांच्या शोधावर अद्याप बरंच काम होणं बाकी आहे. हा शोध सिद्ध होण्यासाठी बरीच वर्ष जातील. पण या ग्रहांना मात्र तिला आपले आईवडील आणि ब्राझीलमधल्या शास्त्रज्ञांची नावं द्यायचीत. फोर्टालेझा इथल्या शाळेतले खगोलशास्त्राचे शिक्षक हेलिओमार्जिओ रोड्रिग मोरेरा 'एजंसे फ्रांस प्रेसे'ला सांगतात की, 'ती खूप हुशार आहे. सगळं काही ती ओळखते. चित्रांमधले लघुग्रहांचे ठिपके ती क्षणार्धात ओळखू शकते.'

मोठी स्वप्न, मोठे प्रयत्नही

निकोल 'अलागावोस ऍस्ट्रोनॉमिकल स्टडीज सेंटर, सेन्ट्रो डी ऍस्टुडोस ऍस्ट्रोनॉमिको डी अलागावोस' अर्थात सीईएएएल या ब्राझीलमधल्या खगोलशास्त्रज्ञांच्या संस्थेची सगळ्यात तरुण सदस्य आहे. त्यामुळेच तिला जून २०२१ ला ब्राझीलच्या विज्ञान, तंत्रज्ञान आणि इनोवेशनच्या खगोलशास्त्र आणि वैमानिक विषयावरच्या पहिल्या आंतरराष्ट्रीय सेमिनारमधे बोलण्याची संधी मिळाली. तसंच तिच्या मूळ गावीही तिला व्याख्यानं देण्यासाठी बोलावलं जात असल्याचं ब्राझील न्यूज एजन्सी आर ७ नं म्हटलंय. इतक्या चिमुकल्या वयात निकोल खगोलशास्त्रातल्या वेगवेगळ्या तज्ज्ञांशी संवाद साधतेय. तिने गेल्यावर्षी ब्राझीलमधले पहिले अंतराळवीर मार्कोस पोटेंस यांची भेट घेतली होती. आपल्या युट्यूब चॅनेलवरून तिने ब्राझीलमधले सुप्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ ड्युलिया डी मेलो यांचीही मुलाखत घेतली होती. खगोलशास्त्रातल्या तज्ज्ञांशी संवाद साधणं, आपल्या मित्रांना लघुग्रह, अंतराळाविषयी माहिती देणं हा तिच्या युट्यूब चॅनेलचा महत्वाचा उद्देश आहे.

# सोळंके कारखान्याकडून शेतकऱ्यांच्या जीवनात 'प्रकाश'

## साखर आयुक्त शेखर गायकवाड यांचे गौरवोद्गार; बॉयलर अग्नीप्रदिपन समारंभ उत्साहात





प्रतिनिधी

माजलगाव : दुष्काळग्रस्त भागात साखर कारखाना सुरू करून मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या जीवनात प्रकाश पाडण्याचे काम लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याने केले आहे, असे गौरवोद्गार महाराष्ट्र राज्याचे साखर आयुक्त शेखर गायकवाड यांनी शुक्रवारी काढले. ते तेलगाव येथे सोळंके कारखान्याच्या बॉयलर अग्नी प्रदीपन कार्यक्रमात बोलत होते.

तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२१-२२ या ३० व्या बॉयलर अग्निप्रदिपन कार्यक्रम शुक्रवार, दिनांक ८ ऑक्टोबर रोजी दुपारी २:३५ वाजता झाला. यावेळी कारखान्याचे संचालक शिवाजीराव बडे व त्यांच्या सुविद्य पत्नी जनाबाई बडे या उभयतांच्या हस्ते बॉयलर पूजन करण्यात आले. यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी मंत्री तथा आमदार प्रकाश सोळंके हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाराष्ट्र राज्याचे साखर आयुक्त शेखर गायकवाड हे होते. व्यासपीठावर चेअरमन धैर्यशील सोळंके, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोकराव डक, जिल्हा परिषदेचे सभापती जयसिंह सोळंके, सभापती कल्याण आबुज, माजी सभापती जयदत्त नरवडे आदीसह कारखाना संचालक उपस्थित होते.

यावेळी उपस्थीतांना आपल्या मार्मीक शब्दात मार्गदर्शन करताना साखर आयुक्त गायकवाड म्हणाले की, साखर उद्योगाचे माध्यमातुन मागच्या वर्षी आणि या वर्षी २५ हजार कोटी रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात टाकण्याचे काम केले. आजच्या तारखेला जर बघीतले तर पंजाब, गुजरात, उत्तरप्रदेश आदी राज्यामध्ये शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात पैसे येणे बाकी आहे. त्या तुलनेने आपल्या राज्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांची परिस्थिती गत तीन वर्षापासून चांगली आहे. यावर्षी १ लाख हेक्टरने ऊस लागवड वाढ होत आहे. कारण नाशिकमध्ये द्रांक्षे, कांदयाला फटका बसला. तसेच इतरत्रही विविध कारणांनी शेतकऱ्यांना फटका बसला. त्यामुळे बहुतांश शेतकरी आता ऊस लागवडीकडे वळत आहे असे सांगत राज्यात १९५ साखर कारखान्यांपैकी ३५ साखर कारखाने चांगल्या स्थितीत नाहीत. आपल्या कारखान्याचे नाव चांगले असल्यानेच मी येथे आलो.

या कारखान्याने साखर उत्पादना सोबतच उपपदार्थ उत्पादन घेत चांगली प्रगती केली असून या कारखान्याने इथेनॉल दिशेने केलेली प्रगती खरोखरच स्तुत्य असुन इथेनॉलच्या माध्यमातुन या कारखान्याची यशस्वी वाटचाल होतेय. मराठवाडयातील शेतकऱ्यांच्या जिवनामध्ये नवा प्रकाश पाडण्यासाठी हा एक नंबरचा कारखाना असुन यासाठी हा कारखाना पुढाकार घेईल अशी माझी खात्री आहे. आमदार प्रकाश सोळंके व धैर्यशील सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली हा कारखाना निश्चीतच शेतकऱ्यांचे हित जोपासत असल्याचे गौरवोद्गारही गायकवाड यांनी यावेळी काढले.

तर कार्यक्रमाचे अध्यक्षीय भाषणात आमदार प्रकाश सोळंके म्हणाले की, यंदाचा गळीत हंगाम मोठा असून आपल्या कार्यक्षेत्रात ३५ लाख मे.टन ऊस उपलब्धता होत असून आपल्या कारखान्याचे ऊस गाळपाचे उधिष्ठ १२ लाख मे.टन ठेवले आहे. यावर्षीचा हंगाम १५ ऑक्टोबर, २०२१ ते १५ जून, २०२२ पर्यत चालेल अशी शक्यता असुन यंदा इथेनॉल निर्मीतीचे वाढीव प्रकल्प प्रत्यक्षात कार्यान्वीत होणार आहे.

मागच्या दोन-तीन वर्षाच्या केंद्र शासनाच्या, राज्य शासनाच्या धोरणातुन साखरेचे उत्पन्न कमी करायचे आणि इथेनॉल उत्पादन वाढवावयाचे आहे. त्यामुळे यावर्षी साडेचार कोटी लिटर इथेनॉल निर्मीती करण्यात येईल असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कारखान्याचे चेअरमन धैर्यशील सोळंके यांनी करून त्या कारखान्याच्या प्रगतीचा व येणाऱ्या हंगामाचा आढावा त्यांनी घेतला. कार्यक्रमास परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी, सर्व संचालक, अधिकारी, कर्मचारी, कामगार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन कारखान्याचे संचालक प्रकाश शिंदे यांनी केले.

# 'वीज वितरण'ला वाघोरा ग्रामस्थांकडून 'शॉक'



प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील वाघोरा दलितवस्ती मधील लाईट दहा दिवसापासून बंद असून ती लवकर सुरु करुन देण्यात यावी, या मागणीसाठी शोले स्टाईल आंदोलन शुभम माने यांनी केल्याने वीज वितरण कंपनी आली. ताळ्यावर त्यांनी लागलीच सदरची विद्युत पुरवठा सुरू केला.

गेल्या दहा दिवसांपासून वाघोरा येथील विद्युत पुरवठा बंद असल्याने नागरिक परेशान झाले होते. निवेदन अर्ज तसेच राजकिय नेत्यांना याबाबत सारखा पाठपुरावा करूनही विद्युत कर्मचारी व इंजिनियर काही केल्याने याबाबत गांभिर्याने घेत नसल्याने येथील नवतरुण शुभम माने यांनी चक्क शोलेस्टाईल आंदोलन करत विद्युत डीपीवर चढत जोपर्यत लाईट सुरू करत नाहीत, तोपर्यत या डीपीवरुन खाली येणार नाही असा पावित्रा घेतल्याने सदरिल विद्युत वितरण कंपनिवाल्यांनी सदरचा विद्युत पुरवठा सुरू केल्याने हे शोलेस्टाईल आंदोलन मागे घेण्यात आले.




# शिवसेना गंगामसला सर्कलप्रमुखपदी लखन गायकवाड यांची निवड

प्रतिनिधी

माजलगाव : शिवसेना बीड जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव यांच्या निर्देशानुसार शिवसेना गंगामसला सर्कलप्रमुखपदी लखन गायकवाड तर उपप्रमुखपदी बाळासाहेब खिस्ते यांची रविवारी निवड करण्यात आली.

शिवसेनेचा विचार तळागाळापर्यत पोहचविण्यासाठी ग्रामीण भागात शिवसेनेचे व्यापक संघटन उभारणार असल्याचे ग्वाही नवनियुक्त सर्कलप्रमुख लखन गायकवाड यांनी दिली. यावेळी अतुल उगले, दासू बादाडे, सुखदेव धुमाळ, अप्पासाहेब सुरवसे, पपल गायकवाड, करण ढगे, मोकिंदा मिरगे, सचिन चुंबळे , बाळासाहेब तुंबारे, शरद घुंगाशे, तातेराव लंबाटे, वैभव चव्हाण, सुनिल घुंगाशे, यादी उपस्थित होते. या निवडीबद्दल शिवसेना बीड जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव यांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# 'रोषणपुरी स्वस्त राशन दुकानातील अनागोंदी कारभाराची चौकशी करा'

प्रतिनिधी

माजलगाव : तालुक्यातील रोषणपुरी येथील स्वस्त धान्य दुकानदार सुखदेव बळीराम ताकट यांनी अन्न सुरक्षा व अंत्योदय योजनेमधील लाभार्थ्यांना केंद्र शासनाने दिलेला प्रति महिना पाच किलो अतिरिक्त मोफत माल व त्यांना नियमीत मिळणारा माल हे दोन्ही धान्य न देता काही महिण्यात फक्त मोफतचा आलेला माल दिला व नियमीत मिळणारे धान्य दिले नाही. या गैरकारभाराची चौकशी करण्याची मागणी बालासाहेब गंगाधर डांगे यांनी तहसिलदारांकडे निवेदनाव्दारे केली आहे.

अंत्योदय योजनेच्या व अन्न सुरक्षा योजनेच्या लाभार्थ्यांना ते शेतकरी कार्ड आहेत म्हणून भासवून




त्यांना मोफत आलेला व अंत्योदय, अन्नसुरक्षेचा माल दिला नाही. तरी याची सखोल चौकशी करून संबंधित दुकानदाराविरूध्द योग्य ती कारवाई करावी अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा व्हा.चेअरमन बालासाहेब गंगाधर डांगे, वचिष्ठ रंगनाथ डांगे, मुक्ताराम गिन्यानदेव ताकट यांनी दिला आहे




# सांडस चिंचोलीकरांचे पुनर्वसनाचे ग्रहण कधी सुटणार?

## दोन दशकापासून महापूराशी सामना; ग्रामस्थांची प्रशासनाकडे याचना

प्रतिनिधी

माजलगाव : गेल्या दोन दशकापासून तालुक्यातील सांडस चिंचोलीकर महापूराशी सामना करत आहेत. दरवर्षी महापूर आला की, सांडस चिंचोलीला पाण्याचा वेढा पडतो. जीव मुठीत घेवून ग्रामस्थ जीवन जगत आहेत. शासन-प्रशासनाकडे पुनर्वसनाची मागणी केली असली तरी याकडे गांभीर्याने बघितले जात नाही, अशी माहिती सरपंच सुनिता कदम यांनी 'वर्तमान'शी बोलताना दिली.

बीड व माजलगाव शहरासह आसपासच्या खेड्यापाड्यांची तहान भागवणारे माजलगावचे धरण, ४५४.००० दलघमी इतकी या प्रकल्पीय क्षमता असलेले जिल्ह्यातील सर्वात मोठे धरण, या धरणाच्या पुढे १० ते १५ किलोमीटर अंतरावर सिंदफणा नदी पात्राच्या काठी सांडस चिंचोली हे गाव वसलेले आहे. या गावाची भौगोलिक स्थिती अगदी बेटासारखी असून सिंदफणा नदी गावाला वेढा घालून वाहते. दरवर्षी पाऊस आला की या गावचे ग्रामस्थ पूर येऊ नये म्हणून देव पाण्यात घालून बसतात. कारण पूर आला की गावातील लोकांना कितीही महत्वाचे काम असले तरी अडकून बसावे लागते. शिवाय कधी या पुराचे पाणी गावातही शिरेल व आपल्याला जलसमाधी मिळेल, अशी भीतीही या गावच्या ग्रामस्थांत आहे. साधारण तीन हजार लोकसंख्या असलेल्या या गावाला जोडणारा पुलही सद्या पाण्याखाली आहे. त्यामुळे ग्रामस्थांना ना बाहेर जाता येते, ना कोणाला इकडे येता येते. त्यामुळे या गावाचा संपर्क पूर आला की तुटतो. यंदाही तीच परिस्थिती आहे. आतापर्यंत सांडस चिंचोली ग्रामपंचायतीने प्रशासनास निवेदन सादर करत वारंवार गावाचे पुनर्वसन करण्यासाठी निवेदन सादर केलेले आहे. परंतु, त्यावर कसलीही कार्यवाही होऊ शकलेली नाही. सरपंच सुनिता अशोक कदम, उपसरपंच कृष्णा लिंबुरे यांनी २२ सप्टेंबर रोजीच तहसीलदारांना निवेदन देत गावाच्या पुनर्वसनाविषयी मागणी केली. प्रशासनाने निर्णय नाही घेतला तर आम्हाला एखाद्या पावसाळ्यात जलसमाधी मिळेल, अशी भीती ग्रामस्थ व्यक्त करतात.

### मायबाप सरकार लक्ष देईल काय? : बाबासाहेब कापसे



सातत्याने गेल्या महिन्यात अतिवृष्टी होत असून आता माजलगाव प्रकल्पही पूर्ण क्षमतेने भरला आहे. प्रकल्पातून पाण्याचा विसर्ग सुरू असून सिंदफणा नदी पात्रात पाण्याची पातळी वाढताच सांडस चिंचोली या गावाला बेटासारखे स्वरूप प्राप्त होते. सप्टेंबर महिन्यात तीनदा गावाला पाण्याचा वेढा पडला, तर त्यावेळी सलग चार दिवस एकही नागरिक घराबाहेर पडलेला नाही. त्यामुळे गावाचा संपर्कच तुटल्यासारखी परिस्थिती आहे. दरम्यान, सिंदफणा नदीला महापूर आल्यानंतर सांडस चिंचोली ग्रामस्थांच्या काळजाची धडधड अधिक वाढते. यात आमच्या प्रश्नाकडे मायबाप सरकार लक्ष देईल काय? असा सवाल ग्रामस्थ बाबासाहेब कापसे यांनी 'वर्तमान'शी बोलताना विचारला.




# पाहिजेत

अल्पावधीतच लोकप्रिय ठरलेल्या
तिरुमला इडीबल ऑईल, तिरुमला कोकोनट आईल, द कुटे ग्रुप डेअरी
मुख्य कार्यालयात रिक्त पदे भरणे आहेत.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदसंख्या | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|
| १ | अकाऊंटंट लिपीक (महिलांसाठी) | ३० | एम.कॉम./बी.कॉम. टॅली संगणकाचे ज्ञान आवश्यक |
| २ | सेल्स कोऑर्डीनेटर (महिलांसाठी) | २५ | एम.बी.ए. |

मुलाखत
मंगळवार दि. १२ ऑक्टोबर २०२१ वेळ सकाळी १०.३० वा.

ठिकाण
द कुटे ग्रुप मुख्य कार्यालय, बीड.

मुख्य कार्यालय : स.न.५३/१ नावा मोंढा, बहिरवाडी रोड, बीड.
(02442) 225886 Mo. 9130046346 / 8291887028

# बालासाहेब केकान यांनी आंदोलनाचे हत्यार उपसले; झोपलेले प्रशासन जागे झाले

## चाटगावच्या रस्त्याप्रश्नी ठोस आश्वासन; रास्ता रोको मागे

▶ प्रतिनिधी



किल्लेधारूर : तालुक्यातील मौजे चाटगाव जोडरस्ता दुरूस्ती प्रश्नी भाजपा युवा नेते बालासाहेब केकान यांनी आंदोलनाचे हत्यार उपसल्यानंतर प्रशासन खडबडून जागे झाले. शनिवारी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या अधिकाऱ्यांनी दिंद्रुड पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रभा पुंडगे यांच्या समक्ष युवा नेते बालासाहेब केकान यांना रस्त्याच्या कामाचे मंजुरी पत्र देवून ११ ऑक्टोबर रोजी पुकारलेले रास्ता रोको आंदोलन मागे घेण्याची विनंती केली.

बीड-परळी महामार्गालगत असलेल्या चाटगाव येथील जोडरस्त्याचे काम गेल्या दहा वर्षापासून रखडलेले आहे. या प्रश्नी चाटगावचे उपसरपंच तथा भाजपा युवा नेते बालासाहेब केकान यांनी संबंधितांना वेळोवेळी निवेदने दिलेली आहेत. येत्या ११ ऑक्टोबर रोजी बीड-परळी महामार्गावर शेकडो ग्रामस्थांना बरोबर घेवून रास्ता रोको करण्याचा इशारा जिल्हा परिषदेच्या विभागाला निवेदनाद्वारे केकान यांनी दिला होता. त्यानुसार केकान कोणत्याही परिस्थितीत आपल्या आंदोलनावर ठाम होते. शुक्रवारी जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या अभियंत्यांनी दिंद्रुड पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रभा पुंडगे यांच्या समक्ष आंदोलक बालासाहेब केकान यांच्याशी चर्चा केली. आंदोलन मागे घेण्याची विनंती केली. मात्र त्यानंतरही केकान आपल्या आंदोलनावर ठाम होते. शनिवारी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या बीड कार्यालयातील अधिकाऱ्यांनी दिंद्रुड येथे धाव घेवून चाटगाव जोडरस्ताचे काम लवकरच सुरू करू अशी ग्वाही पत्रात देण्यात आलेली आहे. त्यानुसार बालासाहेब केकान यांनी ग्रामस्थांच्या सहमतीने आंदोलन मागे घेत असल्याचे जाहीर केले.




### 'वर्तमान'ने मांडली होती कैफियत

'आपले वृत्तपत्र, आपला आवाज' हे ब्रीद घेवून समाजाचे विविध प्रश्न शासन दरबारी ठामपणे मांडणाऱ्या आधुनिक विचारांचे वर्तमानने चाटगाव रस्ताची कैफियत सर्वप्रथम मांडली. दि.२८ सप्टेंबर रोजी 'जिजांनी झुलवत ठेवले, दादांचे आश्वासन हवेत विरले' या मथळ्याखाली ठळक वृत्त दिले होते. या वृत्तामुळे प्रशासन जागे झाले. 'वर्तमान'ने घेतलेल्या सामाजिक भूमिकेमुळे प्रशासनाचे लक्ष वेधले लवकरच रस्त्याचे काम मार्गी लागेल. 'वर्तमान'ने घेतलेल्या सडेतोड भूमिकेबद्दल बालासाहेब केकान आणि ग्रामस्थांनी संपादकांचे धन्यवाद मानले आहेत.

# अतिवृष्टीच्या संकटात सापडलेल्या बळीराजाला उभारी मिळो

## जि.प.सदस्य चंद्रकांत शेजुळ यांचे तुळजाभवानी मातेकडे साकडे

▶ प्रतिनिधी

माजलगाव : पात्रुड जिल्हा परिषदेचे सदस्य तथा तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष चंद्रकांत शेजुळ गेल्या १६ वर्षापासून नवरात्र उत्सवानिमित्त आबेगाव ते तुळजापूर अशी पायी दिंडी काढतात. यंदा अतिवृष्टीच्या महासंकटात सापडलेल्या बळीराजाला पुन्हा नवे बळ दे, असे साकडे आई तुळजाभवानी मातेकडे घालणार असल्याची माहिती 'वर्तमान'शी बोलताना चंद्रकांत शेजुळ यांनी दिली. ते शुक्रवारी तेलगाव (ता.धारूर) येथे पायी दिंडी दरम्यान बोलत होते.

राष्ट्रवादीचे युवा नेते असलेले चंद्रकांत शेजुळ तुळजाभवानी मातेचे निस्सीम भक्त आहेत. या अपार श्रध्देपोटी तुळजाभवानी अर्बन मल्टीस्टेट उभी राहीली. गेली १६ वर्ष मागील वर्षीचा अपवाद वगळता आबेगाव ते तुळजापूर ही पायी दिंडी अखंडीतपणे सुरू आहे. दरवर्षी पायी दिंडीतून प्रेरणा आणि ऊर्जा मिळते. मनातील मनोकामना पूर्ण होतात, यावर माझा दृढविश्वास आहे. त्यामुळे भविष्यकाळातही दिडींचे आयोजन नेटाने केले जाईल, असेही चंद्रकांत शेजुळ म्हणाले. धकाधकीच्या जीवनात आज प्रत्येकाकडे धार्मिक कार्यासाठी वेळ कमी आहे. वर्षातील ३६० दिवस सार्वजनिक जीवनासाठी मात्र वर्षातील पाच दिवस आई तुळजाभवानी मातेच्या चरणी समर्पित करतो. मागील दोन वर्षापूर्वी विधानसभा निवडणुकीच्या आधी पायी दिंडीद्वारे तुळजापूरला जावून आई तुळजाभवानी माते चरणी प्रकाश सोळंके आमदार व्हावेत, असे साकडे घातले होते. तुळजाभवानी मातेने ही राजकीय मनोकामना पूर्ण केली. त्यामुळे नव्या उत्साहात आई तुळजाभवानी मातेकडे दरवर्षी साकडे घालून मनोकामना पूर्ण करत असतो, असेही शेजुळ म्हणाले.

### 'ईडापिळा टळो; कोरोनाचे संकट पळो'



यंदा महाराष्ट्रासह संपूर्ण मराठवाड्यात पावसाने थैमान घातल्याने अतिवृष्टी झाली. पिकांचे अतोनात नुकसान झाले. त्यामुळे बळीराजा हतबल झाला आहे. या संकटातून बळीराजाला उभारी देणासाठी बळ मिळो, जगावर घोंगावणारे कोरोनाचे संकट पळो, असे साकडे आई तुळजाभवानी मातेकडे घालणार असल्याची माहिती चंद्रकांत शेजुळ यांनी 'वर्तमान'शी बोलताना दिली.



# कराटेमध्ये माजलगावकरांची गोव्यातही छाप

▶ प्रतिनिधी



माजलगाव : राष्ट्रीय नॅशनल चॅम्पियनशीप स्पर्धाचे आयोजन चार वर्षानी एकदाच करण्यात येत असते. यावर्षी नॅशनल चॅम्पियनशीप स्पर्धचे दोन दिवशीय आयोजन दि.३ ते ५ ऑक्टोबर रोजी गोवा राज्यातील मापसा शहरात आयोजन करण्यात आले होते. या राष्ट्रीय कराटे चॅम्पियनशीपमध्ये माजलगाव कराटे मार्शल आर्ट असोसिएशनचे १० विद्यार्थ्यांनी बाजी मारली. त्यामध्ये ५ विद्यार्थी गोल्ड मेडल, १ सिल्वर मेडल तर ४ ब्रॉंझ मेडल विद्यार्थ्याचा समावेश आहे.

यावर्षी या स्पर्धेचे दोन दिवशीय आयोजन गोवा राज्यातील मापसा शहरात दि.३ ते ५ ऑक्टोबर दरम्यान आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये गोल्ड मेडल चि.सार्थक डोंगरे, कु.धनश्री पटवी, कु.शिवाणी शिंदे, कु.प्रणीता पाटील, चि.कुणाल मेंढके या ५ विद्यार्थ्याचा समावेश आहे, तर सिल्वर मेडल - चि.आनंद राऊत तर ब्रांझ मेडल - चि.आर्यन डोंगरे, चि.प्रसेनजीत माने, कु.आर्या कुलकर्णी, कु.श्रीशा देशमुख यांचा समावेश आहे.या सर्व यशस्वी विद्यार्थ्याना माजलगाव कराटे मार्शल आर्ट असोसिएशनचे अध्यक्ष चंद्रमनी डोंगरे यांनी प्रशिक्षण दिले. या सर्वाचे माजी राज्यमंत्री आमदार प्रकाश सोळंके, जि.प. सभापती जयसिंह सोळंके, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सरचिटणीस दयानंद स्वामी, प्राचार्य सानप यांनी आभिनंदन केले आहे.

## तालुका सचिवपदी ऋषीकेश सांगळे



धारूर : राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस धारूर तालुका सचिवपदाचे ऋषीकेश बाबासाहेब सांगळे यांना नियुक्तीपत्र देताना ज्येष्ठ नेते धैर्यशील सोळंके.

## रस्ता ओलांडताना तरूणाचा बळी

▶ प्रतिनिधी

माजलगाव : रस्ता ओलांडताना भरधाव दुचाकीने धडक दिल्याने एका तरूणाचा मृत्यू झाला. ही घटना बीड रोडवर शनिवारी दुपारी ३ वाजता घडली. बाबू रहेमान आतार (वय ३५, रा.पात्रूड) असे मृताचे नाव आहे. एका खासगी दवाखान्यासमोरून इंडिया बँकेकडे जाण्यासाठी तो रस्ता ओलांडत होता. इतक्यात ऑटोच्या मागून येणाऱ्या भरधाव दुचाकीने त्यास जोराची धडक दिली. यात तो गंभीर जखमी झाला. तेथून जाणाऱ्या पोलिसांच्या जीपमधून त्यास ग्रामीण रूग्णालयात नेण्याचा प्रयत्न केला. मात्र, वाटेतच त्याचा मृत्यू झाला. अपघातात दुचाकीस्वारही जखमी असून, त्याच्यावर खासगी रूग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसत आहे.

# वाहतुकीच्या मुळावर अतिक्रमणे

## न हटवल्यास शिवसेना स्टाईल दाखवू : अप्पासाहेब जाधव

▶ प्रतिनिधी



माजलगाव : शहरातील गल्लीबोळातील आणि मुख्य रस्त्यावर असणाऱ्या अतिक्रमणामुळे सर्वसामान्य नागरिकांना पायी चालणे देखिल अवघड बनले आहे. जुने बसस्थानक व नवीन बसस्थानक परिसराला अतिक्रमणाचा विळखा पडला आहे. छत्रपती संभाजी महाराज चौक ते मौलाना आझाद चौक या रस्त्यावरील अतिक्रमणे नगरपरिषद आणि पोलिसांनी तात्काळ हटवावीत, अन्यथा ही अतिक्रमणे शिवसेना स्टाईलने हटविण्याचा इशारा शिवसेना जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव यांनी पालिका प्रशासनास दिला आहे.

जुने बसस्थानक, नवीन बसस्थानकाला अतिक्रमणाचा विळखा पडला आहे. भर रस्त्यावर ऑटोरिक्षा, अवैध प्रवासी करणाऱ्या जीप, छोटे टेम्पो, हातगाडे, मनमानी पद्धतीने उभी केली जात आहेत. त्यामुळे पादचाऱ्यांसह वाहनचालकांना कसरत करत वाट काढावी लागते. नागरिकांना व महिलांना या रस्त्यावरून जीव मुठीत घेऊन चालावे लागते. अतिक्रमण काढण्यासंदर्भात नगराध्यक्ष शेख मंजूर व मुख्याधिकारी विशाल भोसले, शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांना शिवसेना जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव यांनी निवेदन दिले आहे. याबाबत प्रशासनाने गांभीर्याने विचार करुन हा प्रश्न सोडविण्याची मागणी यावेळी शिवसेनेच्या वतीने करण्यात आली आहे. याप्रसंगी नगरसेवक अशोक आळणे, माजी उपनगराध्यक्ष तुकाराम येवले, उपजिल्हाप्रमुख रामराजे सोळंके, माजी नगरसेवक शिवमूर्ती कुंभार, शिवसेना उपतालुकाप्रमुख अतुल उगले, कल्याण बल्लाळे, अनिल धुमाळ, अशोक वाघमारे, प्रविण गवते, योगेश उगले, बबलू पटेल, हरिभाऊ गवते, सुखदेव धुमाळ आदी उपस्थित होते.



### नगराध्यक्षांनी लक्ष घालावे

सध्या नवरात्री उत्सव काळात हनुमान मंदिरापासून तुळजाभवानी देवी मंदिर परिसरात जाताना भाविकांना त्रास होत आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकापासून ते मौलाना आझाद चौक या परिसरातील अतिक्रमण नगरपालिकेने काढून रस्ता खुला करावा, अशी मागणी शिवसेनेकडून करण्यात आली आहे. दरम्यान, विद्यमान नगराध्यक्ष शेख मंजूर यांनी लक्ष घालावे अशी मागणी जोर धरत आहे.















आधुनिक विचारांचे वर्तमान
हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.